**Parag Phatak,**
**Journalist, BBC Marathi**



सामाजिक भान, सामाजिक बांधिलकी असे शब्द आपण वारंवार ऐकतो. समाजातल्या परिस्थितीबाबत, प्रश्नांबाबत वाचतो, ऐकतो, चर्चाही करतो. पण कृतीच्या बाबतीत पॅसिव्ह राहतो. सामाजिक कार्यकर्ते आणि डॉक्टर असलेल्या अभय आणि राणी बंग यांनी साधारण दशकभरापूर्वी NIRMAN उपक्रम सुरू केला.

थिअरीची, संशोधनाची ठोस बैठक आणि त्याचवेळी प्रत्यक्ष भवतालाचं चोख आकलन यांचा मेळ घालून गडचिरोली भागात त्यांचं काम गेली अनेक वर्ष सुरू आहे. तरुण मुलामुलींमध्ये असलेली ऊर्जा योग्य दिशा आणि निमित्ताप्रती एकवटेल या उद्देशाने निर्माण हा उपक्रम सुरू झाला.
हा उपक्रम नक्की काय आहे हे समजून घेणं आवश्यक आहे. NIRMAN हा कोर्स नाही. ती एक चळवळ आहे. साहजिकच NIRMANचे कॅम्प केल्यावर कोणतंही प्रमाणपत्र मिळत नाही. कुठलीही गुण, श्रेणी, प्रगतीपुस्तक नाही. NIRMANची तीन शिबिरं गडचिरोलीजवळच्या शोधग्राममध्ये होतात. आठ दिवसांचं निवासी शिबीर असतं. यासाठी फॉर्म भरावा लागतो. सामाजिक कामासंदर्भात अनेक प्रश्नांची मांडणी असते. राज्यभरातून, राज्याबाहेरून अर्ज येतात. त्यानंतर मुलाखतीची प्रक्रिया होते. ज्यांची निवड होते त्यांना शिबिराला जाण्याची संधी मिळते.

आता सगळेच आपलं शिक्षण,नोकरी, व्यवसाय सोडून सामाजिक क्षेत्रात येऊ शकत नाहीत. पण आपापलं काम सांभाळून एखाद्या प्रश्नासाठी योगदान देता येतं. ते कसं द्यावं हे जाणून, समजून घेण्याची प्रकिया शिबिरांमध्ये होते. सामाजिक प्रश्न काय आहेत हे समजण्यासाठी समाज काय हे उमगायला हवं. त्यासाठी शिबिरांमध्ये सेशन्स, बौद्धिक exercise असतात. श्रमदान असतं.

एखाद्या विषयावर काम करणारे तज्ज्ञ येऊन बोलतात. गटाने काही activity कराव्या लागतात. प्रेझेंटेशन करावं लागतं. सगळे मिळून डॉक्युमेंटरी पाहता येते. फिल्ड व्हिजिट असते. हे सगळं धीरगंभीर वाटलं तर हसत खेळत धमाल करत सुरू असतं.

दोन शिबिरांमध्ये मिळून आपल्याला नक्की काय करता येईल याचा अंदाज येतो. शेतीविषयक, पाण्यासाठी व्यसनमुक्तीविषयक, तंत्रज्ञानविषयक, शिक्षणासंदर्भात- आपल्याला आपलं डोमेन समजतं. आता त्यात पूर्णवेळ काम करायचं, अर्धवेळ करायचं, कॉन्ट्रिब्युटर म्हणून काम करायचं ते आपल्यावर आहे. निर्माणचं शिबीर केल्यावर एकदम माणूस सामाजिक कार्यकर्ता होऊन बाहेर पडत नाही. पण वैचारिकदृष्ट्या समृद्ध होतो. कृतीसाठी ठोस दिशा मिळते. सोशल चेंज मेकर होण्यादृष्टीने फाऊंडेशन तयार होतं असं आपण म्हणू शकतो.

NIRMANच्या आठव्या बॅचची शिबीरं सध्या सुरू आहेत. आठ वर्ष- आठ बॅच मिळून अनेक मुलंमुली या उपक्रमाचा भाग आहेत. यातले अनेकजण एखादा विषय पक्का करून त्यासंदर्भात पूर्णवेळ काम करत आहेत. काहीजण आपापलं क्षेत्र सांभाळून एखाद्या मुद्यासाठी वेळ काढत आहेत. पॅटर्न वेगवेगळा. नववी बॅच लवकरच सुरू होईल. त्यासाठीची प्रोसेस सध्या सुरू आहे. 15 ऑगस्ट अर्ज करण्याची शेवटची तारीख आहे.

तुमच्या घरात, नातेवाईकांमध्ये, बिल्डिंग-कॉम्प्लेक्समध्ये, मित्रमैत्रिणींमध्ये, ऑफिसमध्ये, कॉलेजात 18 ते 28 वयोगटातली विचार करू शकणारी, समाजासाठी काहीतरी करायला हवं अशी किमान बेसिक भावना असलेली, वाचन करणारी मुलंमुली असतील तर त्यांना तुम्ही NIRMANविषयी सांगू शकता.

हल्लीची तरुण पिढी वाया गेलेय असं अनेकदा कानावर पडतं. वाया जाऊ नये यासाठी योग्यवेळी बौद्धिक मशागत होणं आवश्यक असतं. त्यादृष्टीने चांगली संधी आहे. त्याचवेळी अनेक युवा कार्यकर्ते नॅनो लेव्हलला काम करत आहेत. आता त्यांच्या कामाचं स्वरुप ऐतिहासिक नसेल पण त्यांचे प्रयत्न, धडपड, दृष्टिकोन मोलाचा आहे. राजेंद्र सिंह एका दिवसात घडत नाहीत. प्रोसेस असते. असं काम करावं वाटत असेल तर NIRMAN हे उत्तम व्यासपीठ आहे.

सध्या एवढा विखार आजूबाजूला आहे आपल्या. अशावेळी चांगली माणसं चांगलं काम करत आहेत. त्याला आपला पाठिंबा व्यक्त करणं हेही आपलं एकप्रकारे योगदानच आहे. अधिक माहिती खाली दिलेल्या लिंक्सवर तुम्हाला मिळू शकते.

निर्माणची वेबसाइट आहे- http://nirman.mkcl.org/
इथे तुम्हाला उपक्रमाविषयी, शिबिराविषयी, मुलंमुली काय आणि कसं काम करतात याबद्दल सविस्तर माहिती मिळू शकते.

निर्माणचं फेसबुक पेज आहे-

https://www.facebook.com/nirmanforyouth/
इथेही तुम्हाला तपशीलवार समजू शकतं